# २०१७ चे एकरूप परिनियम क्रमांक २

(प्रकाशन दिनांक - १७ मे २०१७)

## पदवीधरांच्या नोंदणीकरिता अर्जाचा नमुना आणि शुल्क प्रदान करणे

संदर्भ - म.सा.वि.अ., २०१६ - कलम १३४ (३)

# UNIFORM STATUTE No. 2 OF 2017

(Publication Date - 17 May 2017)

## Form of Application for Registration of Graduates and Payment of fees

Ref - M.P.U.A., 2016 - Section 134 (3)

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ मे २०१७

## अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र. ३४७/कार्या-विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. क्र. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) आणि कलम १३४ चे पोट-कलम (३) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पदवीधरांची नोंदणीकरिताचा अर्ज आणि शुल्काचे प्रदान याच्याशी संबंधित एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

### सन २०१७ चे एकरूप परिनियम क्रमांक २

**१. संक्षिप्त नाव :——** या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (पदवीधरांच्या नोंदणीकरिता अर्जाचा नमुना आणि शुल्क प्रदान करणे) एकरुप परिनियम, २०१७ असे म्हणावे.

**२. अर्ज व फी चे प्रदान :—**

(१) नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी एखादी व्यक्ती विहित नमुन्यामध्ये, कुलसचिवाकडे विद्यापीठाने निर्धारित केलेले शुल्क (जे जास्तीत जास्त रु. २० असेल) प्रदान करून अर्ज करील.

(२) पदवीधरांच्या नोंदणीसाठीचा अर्ज हा या परिनियमांना जोडलेल्या जोडपत्र - १ मध्ये नमुन्यामध्ये असेल व तो विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

(३) नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी एखादी व्यक्ती, नोंदणीसाठीच्या तिच्या अर्जासोबत, पुढील दस्तऐवज जोडील :—

(क) पदवी प्रमाणपत्र;

(ख) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा.

**३. पदवीधरांची नोंदणी :—**

(१) अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्यापीठ, समुचित नोंदवहीमध्ये यथोचित अर्हता असलेल्या व्यक्तींच्या नावांची, त्यांनी विनिर्दिष्ट केलेली विद्याशाखा स्पष्टपणे नमूद करून, नोंद करील,

(२) नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत ज्यांच्या नावांची नोंद करण्यात आली आहे अशा सर्व व्यक्ती , नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत आपल्या नावांची नोंद करून घेण्यात हक्कदार असतील.

(३) नोंदणीकृत पदवीधर, त्यांच्या पत्यांमध्ये झालेले प्रत्येक बदल, कुलसचिवाला कळवील.

(४) पदवीधरांची नोंदवही, निवडणुकांच्या प्रयोजनासाठी तयार केलेल्या दिनांकापासून प्रत्येक पाच वर्षांच्या शेवटी सुधारित करण्यात येईल.

(५) नवीन विद्यापीठ हे ज्या मूळ विद्यापीठातील पदवीधरांची नोंदणी करण्यात आली आहे, अशा नोंदणीकृत पदवीधरांची नावे मूळ विद्यापीठाला तात्काळ कळवील.

**जोडपत्र-१**

**............ विद्यापीठ**

**पदवीधरांची नोंदणी करण्याकरिता अर्ज**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नोंदणीकृत पदवीधराचे तपशील : | नवीन अर्ज | | कार्यालयीन वापराकरिता | |
| | | | तुकडी क्रमांक | |
| नोंदणीकृत पदवीधर क्रमांक : | | | अनुक्रमांक | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नाव | ................ | | | | |
| जन्म दिनांक | ................ | भ्रमणध्वनी | ............ | ईमेल आयडी | ................ |
| सध्याचा पत्ता | ................ | | महाविद्यालयाचे नाव | | ................ |
| विद्याशाखा | ................ | | पदवी | | ................ |

टीप.—मतदान केंद्राच्या उपलब्धतेचा विचार करून, प्राधान्यक्रमानुसार मतदान केंद्राचे वाटप करण्यात येईल.

| | |
|---|---|
| पसंती क्रम दिलेले मतदान केंद्र | १) ................<br>२) ................<br>३) ................ |
| सहपत्र | अधिसुचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे दस्तऐवज जोडणे. |

मी, विनंती करतो की, कृपया माझ्या नावाची विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करण्यात यावी.

मी, घोषित करतो की, मी,

(क) विकलमनाचा नाही आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले नाही ;

(ख) अमुक्त नादार नाही ;

(ग) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल मला दोषी ठरविण्यात आलेले नाही ;

(घ) लबाडीच्या मार्गाने पदवी मिळवली नाही ; आणि

(ङ) महाराष्ट्र राज्यात कायाद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर नाही.

मी, घोषित करतो की, नमुन्यामध्ये देण्यात आलेली माहिती खरी असून माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे अचूक आहे. माझ्याकडून देण्यात आलेली कोणतीही माहिती चुकीची किंवा खोटी असल्याचे आढळून आल्यास, माझा अर्ज फेटाळण्यास पात्र असेल.

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराची सही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिध्दार्थ खरात,**

शासनाचे उप सचिव.